महाराष्ट्र शासन
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड
वसंतनगर उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ
Email arcs.yml.ukd@gmail.com दुरध्वनी क्रमांक :- ०७२३१२२३७२६८

क्र.सनिउ/नियमन /कलम७७ अ/ १२३ /२०१८ दिनांक :- २३.१.२०१८

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अंतर्गत आदेश**

**वाचा:-**

१. **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ**
२. **सचिव , ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था म. निंगणुन र.नं.३२१ ता. उमरखेड जि.यवतमाळ यांचा दि. २२.१.२०१८ चा अर्ज**

ज्याअर्थी, ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था म. निंगणुन र.नं.३२१ ता. उमरखेड जि.यवतमाळ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था असून उक्त कायदा, नियम व संस्थेचे उपविधी यामधील तरतुदीनुसार संस्थेचे कामकाज करण्याची वैधानिक जबाबदारी संस्था सदस्यांची व समितीची आहे.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचा क्र. २ संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपलेली आहे. संस्थेच्या एकुण थकीत कर्जदार सभासद ६९८ (सहाशे अठ्ठयान्नव) असुन , सन २०१४ त`२०१७ पर्यंत बँकेने थेट कर्जवाटप केले आहे. सन २०१६/२०१७ साली बँकेने केलेल्या थेट कर्जवाटपामध्ये १० सभासदांना कर्जवाटप झाले असुन , १० सभासद चालु कर्जदार आहे. उर्वरित सभासद थकीत आहेत. त्यांची कर्जमाफीची प्रक्रिया चालु आहे. आजपावेतो १५७ सभासदांना कर्जमाफी झाली आहे. त्यामुळे सविनय विनंती की, निंगणुर ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था र.नं.३२१ या संस्थेच्या निवडणुकीबाबत आपल्यास्तराव योग्य तो निर्णय घ्यावा करीता विंनती अर्ज सादर करीत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१) (१-अ) (ब) मध्ये कोणत्याही समितीचा किंवा तिच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी संपला म्हणुन किंवा इतर कोणत्याही कारणासाठी निवडणुक घेण्यात आली व त्यावेळी रिकाम्या जागा भरण्यासाठी आवश्यक असलेले सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसुर झाली आहे, तेव्हा नविन समिती पदग्रहण करीतोपर्यंत संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी नमता येतील अशी तरतुद आहे.आणि,

ज्याअर्थी, ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था म. निंगणुन र.नं.३२१ ता. उमरखेड जि.यवतमाळ या संस्थेचा संचालक मंडळाची मुदत संपली आहे. त्यामुळे संस्थेच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी व संस्थेचे कर्जवाटप , कर्जवसुली व इतर अनुषंगिक कामकाज सुरळीत चालु ठेवण्यासाठी व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१) (फ) (दोन) चे परंतुकान्वये नोटीस प्रसिध्द न करता तात्काळ प्राधिकृत अधिकारी नेमणुक करणे आवश्यक व क्रमप्राप्त झाले असल्याची माझी खात्री झाली आहे .आणि,

त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-::आदेश::-**

मी एस.एस.भालेराव सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१) (१-अ) (ब) मधिल तरतुदीनुसार ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था म. निंगणुन र.नं.३२१ ता. उमरखेड जि.यवतमाळ या संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी श्री.ए.एस.राठोड निरिक्षक यवतमाळ जिल्हा मध्यवती

Scanned by CamScanner

सहकारी बँक शाखा फुलसावंगी/ चिखली वन ता.उमरखेड जि.यवतमाळ हयांची पुढील ६ महिण्याकरीता सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. संस्थेचे प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच संस्थेचे उपविधी व कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामकाज करावे.

सदर आदेश आज दि.२३.१.२०१८ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेनिशी देण्यात येत आहे.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड

(एस.एस.भालेराव)
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था उमरखेड**

**प्रति,**

१. अध्यक्ष / सचिव, ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था म. निंगणुन र.नं.३२१ ता. उमरखेड जि.यवतमाळ यांना सुचित करण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी यांना संस्थेचा पदभार देवुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. श्री.ए.एस.राठोड निरिक्षक यवतमाळ जिल्हा मध्यवती सहकारी बँक शाखा फुलसावंगी/ चिखली वन ता.उमरखेड जि.यवतमाळ तथा प्राधिकृत अधिकारी ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था म. निंगणुन र.नं.३२१ यांना सुचित करण्यात येते की, सदर संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी पदाचा प्रभार स्वीकृत करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा व विहित मुदतीत निवडणुक घेण्याची कार्यवाही करावी.

३.मुध्य कार्यकारी अधिकारी , यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.यवतमाळ यांना माहितीकरीता अग्रेषित.

४.शाखा व्यवस्थापक , यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.यवतमाळ शाखा फुलसावंगी ता.उमरखेड जि.यवतमाळ यांना माहितीकरीता अग्रेषित .

**प्रतिलीपी सादरः-**

१.मा.सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

२.मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३.मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था उमरखेड**

Scanned by CamScanner